HGH INDIA 2018 SM
HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE
JULY 3-5, 2018 MUMBAI, INDIA
NEWS 3
A TEXZONE Event
Where business feels at home!

# हाउसवेअर आता मोठ्या हॉल ३ मध्ये

गेल्या सात वर्षांत एचजीएच इंडियामध्ये हाउसवेअर श्रेणीचा सातत्याने विस्तार होत आहे. या श्रेणीत आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवरील उत्पादक, ब्रँडस आणि इंपोर्टर्स यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे पाहुण्यांना शो केसमध्ये मांडलेल्य प्रोडक्ट्ची व्हरायटी आणि त्यांची गुणवत्ता यांचाही व्यापक स्तर पहावयास मिळत आहे.

याचा फायदा अनेक बाबतीत पहायला मिळाला आहे. प्रथम म्हणजे वाढत्या उत्पन्नामुळे भारतीय ग्राहकाची हाउसवेअर श्रेणीतील उपश्रेणीत वार्षिक २० ते २५ टक्के वाढ दिसून येत आहे. आता किचनवेअर, टेबलवेअर, कुकवेअर, किचन अप्लायन्सेस, होम अप्लायन्सेस, सिक्युरिटी, बाथ ॲक्सेसरिज, स्टोरेज, मेंटेनन्स, क्लिनिंग आणि हायजीन प्रोडक्ट्स, आउटडोअर आणि गार्डन प्रोडक्ट्स तसेच इतर सामान्य हाउसवेअरचे संपूर्ण देशभरातील रिटेलर्स या ठिकाणी येत आहेत. त्यांना त्यांच्या दुकानासाठी खास वस्तुंची गरज असते. याबाबत वाढत असणा-या मागणीची पूर्तता करण्यासाठी संघटित तसेच ऑनलाईन रिटेलर्स त्यांच्या स्टोअर्समध्ये हाउसवेअर श्रेणीची व्हरायटी आणि जागा वाढवत आहेत.

ग्राहकांच्या बदलत्या खरेदी सवयींमुळे हाउसवेअर आणि होम डेकोर तसेच होम टेक्सटाईल्सच्या श्रेणीमध्ये मागणी मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत आहे. याचे प्रतिबिंबही या ट्रेड शो मध्ये आता आढळून येऊ लागले आहे.

एचजीएच इंडिया २०१८ मध्ये भारतासह आंतरराष्ट्रीय प्रदर्शकांचा सहभाग असणार आहे. यामध्ये प्रामुख्याने तुर्की, यूएसए, कॅनडा, युके, जर्मनी, फ्रान्स, इटली, बेल्जीयम, पोलंड, लक्झंमबर्ग, जपान, कोरिया, हॉंग कॉंग, चायना, तैवान आणि थायलंड या देशांमधील व्यावसायिकांचा समावेश आहे. ते या ठिकाणी पॉट्स, पॅन्स, कढया यासारखे कुकवेअर, प्रेशर कुकर्स, कोटेड कुकवेअर, मिक्सर ग्राईंडर्स, टोस्टर, राईस मेकर, स्टिमर्स, कॉफी मेकर्स यासारख्या किचन अप्लायन्सेसबरोबरच किचन टूल्स, यूटेंन्सील्स, गॅजेट्स आणि रेफ्रिजरेटर ॲक्सेसरिज, फूड कॅरियर, वॉटर बॉटल्स, जार्स, किचन स्टोरेज आणि किचन यूटेंसील्ससारख्या स्टोरेज आयटम्सची विस्तृत श्रेणी प्रदर्शित करणार आहेत.

अनेक तुर्कीश कंपन्या भारतीय इंपोर्टर्स आणि उत्पादकांसोबत त्यांची नाविन्यपूर्ण उत्पादने प्रदर्शित करणार आहेत. यामध्ये हाउसहोल्ड श्रेणीत घरगुती स्टोरेज, घरगुती ऑर्गनायजर्स, बाथरुम ॲक्सेसरिज, शॉवर कर्टन्स. क्लिनिंगमध्ये ब्रूम्स आणि मॉप्स, डस्ट बिन्स, इंसेक्ट किलर्स. हायजीन प्रोडक्टसमध्ये लॅडर्स, क्लॉथ ड्रायर्स, आयर्निंग बोर्डस, फॅन्स, आयर्नस आणि प्लँटर्स आदीचा समावेश आहे.



गेल्या वर्षीच्या एचजीएच इंडिया प्रदर्शनातील हाऊसवेअरचे छोटे दालन (चित्रात दर्शविल्याप्रमाणे), या वर्षी क्र. ३च्या मोठ्या दालनात मांडण्यात येईल.

## टेबलवेअर

एचजीएच इंडियाच्या हॉल ३ मध्ये पाहुण्यांना टेबलवेअरची एक प्रमुख श्रेणी पाहता येईल. यामध्ये पोर्सेलिन, सिरॅमिक, क्रिस्टल, ग्लास, ओपल ग्लास, स्टेनलेस स्टील, मेलमाईन, ॲक्रीलिक तसेच उच्च दर्जाच्या प्लॅस्टिकपासून बनलेल्या क्रोकरी, बार ॲक्सेसरिज, कटलरी, टेबल डिस्पेंसर्स आणि डिनरवेअरचा समावेश आहे.

या ठिकाणी जर्मनीचा रोजंथल, इटलीचा वुसाचे, जपानचा नोरीटाके आणि श्रीलंकेचा डँकॉन्टो हे उच्च दर्जाचे डिनरवेअर ब्रँड्स त्यांच्या भारतीय वितरकांच्या माध्यमातून पाहता येतील. अमेरिकेचा कोरेल, बांगलादेशचा मोनो सिरॅमिक्स तसेच क्ले क्राफ्ट, सोनाकी, एकानी, बीपी भारत, बीएपी सिरॅमिक्स, एएनएस इम्प्लेक्स, लारा हे भारतीय ब्रँड्स बाजारपेठेतील सर्व श्रेणींना अनुसरुन सिरॅमिक आणि पोर्सेलिनच्या प्रोडक्ट्सची एक विस्तृत श्रेणी प्रदर्शित करतील.


Clay Craft

ग्लासवेअरमधील प्रिमीयम सेगमेंटमध्ये इटलीच्या आयसीआरची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. जर्मनीचा नाचमेन आणि इटलीचा बोर्मिओली रॅको हे ब्रँडस् त्यांच्या भारतातील वितरकांच्या माध्यमातून येथे दिसतील. ओशन, लकी, ग्लास, बोर्गोनोवो, लुईगी बोर्मिओली, विडीवी, स्पीगलौ, ड्यूरालेक्स, बोहेमिया क्रिस्टल, क्रिस्टलाईट बोहेमिया, डेव्हनाउ, संजीव कपूर, व्हाईट गोल्ड, रॉक्स आणि लेवो यासारखे ब्रँड्स् उच्च दर्जाची नियमित ग्लासवेअर श्रेणी प्रदर्शित करणार आहेत.

मेलमाईन टेबलवेअर श्रेणीतही नामांकित ब्रँड्स् आपली प्रोडक्ट्स प्रदर्शित करणार आहेत. यामध्ये सर्ववेल, सुपरवेअर, डाईनवेल, हार्मनी आणि सेलोसारख्या ब्रँड्सचा समावेश आहे. किश्को, एडब्ल्यूके, संजीव कपूर, रेना कुट्‌र्ज, श्री अँड सॅम, भलारीया, झेब्रा, एसएनबी इनबॉक्स, रॅमसन्स आणि मोझाईक आदी ब्रँड्स् त्यांच्या स्टेनलेस स्टील कटलरी प्रदर्शित करणार आहेत.

## प्लॅस्टिकवेअर आणि स्टोरेज

भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्लॅस्टिक हाउसवेअर आणि स्टोरेज विभागात लक्षणीय वाढ दिसून येत आहे. ज्यामुळे या विभागातील प्रोडक्ट रेंजही वाढत आहे. शो मध्ये सेलो, एशियन प्लास्टोवेअर, ऑल टाईम प्लॅस्टिक्स, वरमोरा, पारस प्लॅस्टिक्स, एसकेआय, श्री साई प्लास्ट,

# होम टेक्स्टाईल्स, होम डेकोर, हाउसवेअर आणि गिफ्ट्सचा आढावा


All Time Plastics

रुची प्लास्ट यासारखे आघाडीचे भारतीय ब्रँड हाउसहोल्ड स्टोरेज, किचन इसेंशियल्स, किचन स्टोरेज, बॉटल्स, रेफ्रिजरेटर ॲक्सेसरिज, आईस बॉक्सेस आणि युटिलिटिजमध्ये एक विस्तृत श्रेणी प्रदर्शित करणार आहेत.

लक्झंमबर्गचा कर्व्हर, कोरियाचा लॉक एन लॉक, थायलंडचा डीकेडब्ल्यू आणि बॉक्स बॉक्स, तुर्कीचे मिस कलेक्शन, लक्स, टिटीज, रेंगा, उगूर्लर यांच्यासारखे आंतरराष्ट्रीय ब्रँड्स त्यांची दर्जेदार आंतरराष्ट्रीय श्रेणी सादर करणार आहेत. त्यांच्याकडून ऑर्गनायजर्स, स्टोरेज, किचन गॅजेट्स, डस्ट बिन्स, लाँड्री बॉक्सेस, बाउल्स, बाथरूम ॲक्सेसरिज तसेच नावीन्यपूर्ण प्लॅस्टिकवेअरची मोठी व्हरायटी सादर केली जाणार आहे.

या ठिकाणी तुर्कीच्या कॅमल, फ्रीलान्स, प्रोबोट, सोलमेजर कोरियाच्या क्लास लॉक, एएनएस इंम्पेक्स या ब्रँड्सचे सुंदर कलेक्शनही पहावयास मिळणार आहेत. ते येथे मल्टी मटेरियल आणि इन्शुलेटेड वॉटर बॉटल्स, ड्रिंकिंग कप्स, फ्लास्कस, फूड कॅरियर्स, स्टोरेज, किचन गॅजेट्स आणि ॲक्सेसरीजची विस्तृत श्रेणी सादर करतील.

## कुकवेअर

या वर्षी एचजीएच इंडियामध्ये भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय प्रदर्शकांच्याकडून कुकवेअरमधील विस्तारीत श्रेणी पहायला मिळणार आहे. अनेक नामांकित आंतरराष्ट्रीय ब्रँड्स त्यांच्या प्रोडक्ट्सचे प्रदर्शन करून भारतामध्ये वितरक, इंपोर्टर्स किंवा चॅनेल पार्टनर्सच्या माध्यमातून विस्तार करण्याचा प्रयत्न करणार आहेत. यापैकीच एक म्हणजे बेल्जीयमचा बर्गहॉफ हा प्रदर्शक या ठिकाणी प्रथमच येणार आहे. हा ब्रँड इथे पॉट्स, पॅन्स, प्रेशर कुकर्स, केटल्स, ओव्हनवेअर, किचन टूल्स, टेबलवेअर, कटलरिची व्हरायटी सादर करेल. ऑस्ट्रीयाचा बर्गनर हा ब्रँड कुकवेअर आणि किचन टूल्स प्रदर्शित करेल. तुर्कीच्या कोर्कमाजकडून त्यांच्या स्टेनलेस स्टील, नॉन-स्टिक कुकवेअर आणि टेबलवेअर्सचे प्रदर्शन केले जाणार आहे. कोरियाच्या लॉक-


Stahl

एन-लॉककडून सिरॅमिक कोटेड आणि नॉन-स्टिक कुकवेअरचे प्रमोशन होणार आहे. फ्रान्सच्या ड्यूरालेक्सची बेकवेअर श्रेणी भारतीय पार्टनर, एएनएस इम्पेक्सच्या माध्यमातून प्रदर्शित केली जाणार आहे.

भारतातीलही अनेक नामांकित ब्रँड्स या ठिकाणी आपले अनेक नावीन्यपूर्ण प्रोडक्ट्स आणि महत्त्वाच्या व्यावसायिक योजना घेऊन येणार आहेत. यामध्ये पुण्यातील स्टॉल हा ब्रँड त्यांची किचन युटेन्सिल्स, फ्राईंग पॅन्स, ट्राय-प्लाय कुकवेअर तसेच प्रेशर कुकरमधील नवीन श्रेणी घेऊन येणार आहे. मुंबईतील ब्रिलियंट हा ब्रँड नॉन-स्टिक कुकवेअर, शेफिल्डची ग्रिलर्स आणि नॉन-स्टिक कुकवेअर घेऊन येणार आहे. दिल्लीतील बालट्राकडून फ्राईंग पॅन्स, नॉन-स्टिक कुकवेअर, प्रेशर कुकर्स, ग्रिलर्स आणि हिटर्स प्रदर्शित करण्यात येणार आहेत.

## किचन अप्लायन्सेस

छोटे किचन आणि होम अप्लायन्सेस आता वेगाने हौसेचेच नव्हे तर दैनंदिन लाईफस्टाईलचे प्रोडक्ट्स बनत चालले आहेत. या



Borosil

विभागात नावीन्यपूर्णता आता केवळ प्रोडक्ट्सची वैशिष्ट्ये आणि कार्य प्रदर्शन यापुरतीच मर्यादित राहिली नसून रंग, डिझाईन, मटेरियल आणि ब्रँड किंमत यामध्येही दिसून येत आहे. या बदलांमुळे अधिकाधिक होम प्रोडक्ट्स रिटेलर्स अशा प्रोडक्ट्सचा स्टॉक ठेवण्यात रस दाखवू लागले आहेत. बाजारपेठेत अशा ब्रँड्सची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळेच एचजीएच इंडियामध्ये किचन अप्लायन्सेस ही एक विस्तारत असणारी श्रेणी बनली आहे. विशेष किचन अप्लायन्सेस उत्पादकांसोबत अनेक कुकवेअर आणि होम अप्लायन्सेस ब्रँड्सही त्यांच्या अशा प्रोडक्ट्सची श्रृंखला प्रदर्शित करणार आहेत. यामध्ये फूड प्रोसेसर्स, मिक्सर/ग्राईंडर्स, टोस्टर्स, सँडविच मेकर्स, आईस-क्रीम मेकर्स, ज्यूसर्स, ग्रीलर्स, मायक्रोवेव ओव्हन्स, स्टीमर्स, राईस मेकर्स, टी अँड कॉफी मेकर्स, वॉटर प्युरिफायर्स, एअर प्युरिफायर्स, व्हॅक्यूम क्लिनर्स, आयर्नस, वॉटर हीटर्स, कूलर्स, फॅन्स आणि इन्सेक्ट किलर्स आदींचा समावेश आहे.

एचजीएच इंडिया २०१८ मध्ये पाहुण्यांना हॉल ३ मध्ये वरील अप्लायन्सेसचे बोरोसील, बाल्ट्रा, शेफील्ड ब्रिलीयंट, निंजा, शार्क, सेलो, कोर्कमाज आणि बर्गहॉफ हे ब्रँड्स पाहता येतील.

## जनरल हाउसवेअर

हॉल ३ मध्ये प्रदर्शित केल्या जाणाऱ्या या श्रेणीत हाउसहोल्ड स्टोरेज, ऑर्गनायजर्स, लाँड्री बॅग्ज, डस्ट बिन्स, केनस्टर्स,


The Shining Table

आयर्निंग बोर्ड, क्लोथ्स ड्रायर्स, हँगर्स, स्टेप लॅडर्स, प्लॅस्टिक फर्निचर, अंम्ब्रेलाज, हॅमक्स, ट्रॅव्हल गुड्स, क्लिनिंग अँड मेंटेनन्स प्रोडक्ट्स, एरोसोल्स, स्टेन रिमुव्हर्स, टूल किट्स, पेपर टिश्यूज, नॅपकिन्स, डिस्पोजेबल पार्टी युटीलिटिज, हायजीन प्रोडक्ट्स, बाथरुम इसेंशियल्स, प्लांट्स, प्लांटर्स, गार्डनिंग आणि आउटडोअर प्रोडक्ट्स प्रदर्शित केले जाणार आहेत.


Glitter Bags

या विभागात 'यूएसए'चा इंटरडिझाईन हा ब्रँड त्यांचा भारतीय भागीदार स्कँडा रिटेलच्या माध्यमातून बाथररूम ॲक्सेसरिज, ऑर्गनायजर्स तसेच हाउसहोल्ड स्टोरेज प्रदर्शित करणार आहे. तुर्कीचा डॉगरुलर ब्रँड हाउसहोल्ड स्टोरेज, ऑर्गनायजर्स, आयर्नस्, आयर्निंग बोर्ड्स, बेबी चेअर्स, रॉकिंग क्रेडल्स, हॅमक्स, डेकोरेटिव्ह लाईट्स, टेबल टॉप्स आणि लहान फर्निचर प्रदर्शनात मांडणार आहे. भारताचा वासवी हा ब्रँड फूड कॅरियर्स, क्लॉथ स्टँड्स, लॅडर्स, डस्ट बिन्स, केनस्टर्स, व्हॅक्यूम बॉटल्स, स्पोर्टस बॉटल्स, सोप डिस्पेन्सर्स आणि बाथरूम ॲक्सेसरिजची विस्तृत श्रेणी आपले दोन सब ब्रँड्स् विवा आणि एचटूओ यांच्या नावाखाली प्रदर्शित करेल. याशिवाय अनेक तुर्कीश, चायनीज आणि तैवानी प्रदर्शकही सामान्य हाउसवेअर श्रेणीमधील आपली प्रोडक्ट्स् प्रदर्शित करतील.

## सर्व हॉल्समध्ये चायनीज प्रदर्शक

सिंथेटिक लेदरपासून, अपहोल्स्ट्री, ब्लँकेट्स आणि वॉलपेपर्सपर्यंत; सामान्यपासून डेकोरेटिव्ह कँडल्स, प्लॅस्टिक किचन स्टोरेज, किचन टूल्स, किड्स गिफ्ट आर्टिकल्स तसेच डेकोरेटिव्ह ॲक्सेसरिजच्या विस्तृत श्रेणीमध्ये चायनाचे प्रदर्शक एचजीएच इंडिया ट्रेडच्या सर्व तीन हॉल्समध्ये आपल्या प्रोड्क्ट्सची खूप मोठी श्रेणी घेऊन उपस्थित राहणार आहेत.

चायनाहून आलेल्या प्रदर्शकांची होम टेक्स्टाईल्स प्रोडक्ट्स पाहण्यासाठी हॉल १, होम डेकोर आणि गिफ्ट्स पाहण्यासाठी हॉल २ तर हाऊसवेअर आणि गिफ्ट्ससाठी हॉल ३ ला भेट द्यावी लागेल.

# एचजीएच इंडिया २०१८ : ५५० ब्रँडस आणि उत्पादकांच्या प्रोडक्ट्सचे प्रदर्शन

# भारतातील हाउसवेअर बाजारपेठेची क्षमता



*Home Town, a leading retail chain, reflects the changing home shopping habits in India.*

२०२५ पर्यंत भारत ही जगातील पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी ग्राहक बाजारपेठ बनण्याच्या मार्गावर आहे. जागतिक क्षेत्रातील ग्राहक संख्येची वृध्दी ५ टक्के दराने होत असताना भारतीय बाजारपेठेची वृध्दी तब्बल १२ टक्के या दराने होत आहे. वाढत्या उत्पन्नामुळे १० कोटीहून अधिक मध्यमवर्गीय कुटुंबांची क्रयशक्ती लक्षणीयरीत्या वाढताना दिसत असून ती सुखवस्तू श्रेणीमध्ये प्रवेश करत आहे.

गेल्या काही वर्षांत रिटेलिंग हा भारतातील सर्वात आकर्षक आणि वेगाने वाढणारा उद्योग बनला आहे. रिटेल व्यवसायात सातत्याने नवनवीन उद्योजकांचा नवनवीन प्रोडक्ट्स श्रेणीच्या माध्यमातून प्रवेश होताना दिसत आहे. लवकरच भारतातील रिटेल उद्योग ६० टक्क्यांच्या वाढीसह १.१ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याच्या मार्गावर आहे. सध्या ७ टक्के इतका असणारा संघटित रिटेलचा वाटा आता प्रत्येक वर्षी २५ टक्के दराने वाढत आहे. या अनुषंगाने हाउसवेअर व्यवसायाचाही बाजारपेठ आणि रिटेल वातावरणाचाही विचार करणे क्रमप्राप्त बनत आहे.

## इंडियन हाउसवेअर मार्केट

भारतात हाउसवेअरची श्रेणी प्रत्येक वर्षी २० ते २५ टक्के या दराने वाढत आहे. ही श्रेणी जागतिक पातळीवर पारंपारिक तसेच आधुनिक समाजात तितकीच महत्वपूर्ण बनली आहे. भारतातही हाउसवेअर विभागातील ग्राहकांमध्ये एक प्रमुख स्थित्यंतर दिसून येत आहे. आज नागरीकरणाच्या प्रभावाखाली असणाऱ्या आणि छोट्या कुटुंबांमुळे हाउसवेअर खरेदी केवळ महिला वर्गाकडूनच केली जात नसून त्यामध्ये सगळेच सहभागी असतात.

वास्तविक आजही भारतात प्रमाणित दर्जाचे कुकवेअर, टेबलवेअर, किचनवेअर, किचन टूल्स, स्टोरेज, किचन अप्लायन्सेस, क्लिनिंग आणि जनरल हाउसवेअर मर्यादित प्रमाणातच तयार होते. या विभागातील बाजारपेठेत मिळणारे प्रोडक्ट्स प्रामुख्याने आयात केलेलेच अधिक प्रमाणात असतात. आज भारतीय बाजारपेठेत शेकडो इंपोर्टर्स आणि वितरक आहेत, जे एक तर प्रोडक्ट्स इंपोर्ट करतात आणि ते स्वतःच्या ब्रँडच्या नावाखाली विकतात किंवा आंतरराष्ट्रीय ब्रँड्सचे भारतामध्ये प्रतिनिधित्व करतात.

## हाउसवेअर उद्योगातील ट्रेंड्स

भारतामधील लाईफस्टाईलचा विकास होत असताना येथील हाउसवेअर उद्योगातही अनेक प्रमुख बदल घडून येताना दिसत आहेत. नागरीकरणाचे प्रमाण वाढत असताना देशात लहान कुटुंबांची संख्या आणि तांत्रिक प्रगती मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे. त्यामुळे हाउसवेअर प्रोडक्ट्च्या मागणीतही बदल होत आहेत. जागतिकीकरणाचा प्रभाव देशातील कुकिंग, सर्विंग आणि डायनिंग सवयींवरही मोठ्या प्रमाणावर पडताना दिसत आहे.

शहरात राहणाऱ्या जोडप्यांच्या लाईफस्टाईलमध्ये आमूलाग्र बदल घडून येत आहेत. त्यांचे सामाजिक वर्तन, खाण्याच्या सवयीही बदलताना दिसत आहेत. आरोग्यदायी खाद्यपदार्थ, सुविधा, सुरक्षा, कार्य प्रदर्शन, वेळेची बचत करणारी उपकरणे यांचा विचार करुनच आता प्रोडक्ट्सच्या खरेदीचा निर्णय घेतला जातो. प्रोडक्ट्सच्या जटीलतेचा विचार करुनही पती आणि पत्नी समन्वयातून किचनवेअर, कुकवेअर, टेबलवेअर, किचन अप्लायन्सेस, स्टोरेज, क्लिनिंग किंवा मेंटेनन्सच्या प्रोडक्ट्सबाबत किंवा आउटडोअर गुड्सच्या कोणत्याही खरेदीचा अंतिम निर्णय घेतात. बाजारपेठेचे चित्र खूप वेगाने बदलत आहे. आता बाजारपेठेतील बहुतेक हाउसवेअर प्रोडक्ट्स स्टिल, प्लास्टीक, सिरॅमिक, ग्लास यासारख्या मटेरियलच्या कॉंबिनेशनने तयार केले जात असतात. त्यामुळे बाजारपेठेचे क्लासिफिकेशन कमीत कमी मटेरियल प्रभावापासून उपयुक्तता आणि कार्यप्रदर्शनाच्या दिशेने केले जात आहे.

## होम रिटेल परिस्थिती

बहुतेक रिटेल चेन्समध्ये (डिपार्टमेंटल स्टोअर्स, हायपर मार्केट्स, स्पेशालिटी स्टोअर्स) आता होम आणि होम इंम्प्रूवमेंट या सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या श्रेणी बनल्या आहेत. आघाडीच्या रिटेल हाउसेसच्या माध्यमातून होम टाउन, होम सेंटर, होम स्टॉप, ॲट होम आणि इव्होकसारख्या स्पेशल होम रिटेल चेन्स सुरु झाल्या आहेत. वन स्टॉप, महावीर, अल्फा आणि एसडीएचसारखे स्पेशालिटी हाउसवेअर स्टोअर्स हाउसवेअर आणि होम डेकोर रिटेलर्स क्षेत्रात नवीन आयाम जोडताना दिसत आहेत. बिग बझार, स्टार बझार, डी मार्ट, स्पेन्सर्स, स्पार, मोअर, ईझीडे, मेट्रो कॅश एन कॅली यासारख्या चेन्स त्यांचा होम रिटेल विभाग विस्तारित करत आहेत. आयईकेए सारखा आघाडीचा स्पेशलाईज्ड होम रिटेलर लवकरच भारतीय बाजारपेठेत प्रवेश करणार आहे. अमेझॉन आणि फ्लिपकार्टसारखे ऑनलाईन रिटेलर्सही त्यांच्या विक्रीमध्ये वृध्दी करताना दिसत आहेत.

वाढत्या मागणीमुळे ग्राहकांची क्रयशक्तीही वाढताना दिसत आहे. छोट्या आकाराच्या कुटुंबांची संख्या वाढत असल्यामुळे त्या कुटुंबातील व्यक्ती त्यांचे घर अधिक सजवण्यासाठी खर्च करताना दिसतात. त्यामुळेही हाउसिंग विभागात सातत्याने वृध्दी होताना दिसत आहे. परिणामी होम टेक्सटाईल्स, हाउसवेअर आणि होम डेकोर क्षेत्रातील प्रोडक्ट्सची मागणी वाढत आहे. वाढत्या संपन्नतेमुळे ग्राहकांच्या प्रोडक्ट्सकडून अपेक्षाही वाढत चालल्या आहेत. असे लोक डेकोर, डिझाईन्स, ट्रेंड्स, फॅशन आणि ॲसथेटिक्ससाठी अधिक पैसे खर्च करताना दिसत आहेत. या सर्व गोष्टींच्या परिणामी भारतातील बाजारपेठ वाढत आहे तसेच देशातील उत्पादन, रिटेल, वितरण आणि आयात क्षेत्रात प्रचंड संधी उपलब्ध होत आहेत. अर्थातच रिटेल क्षेत्र सर्वाधिक वेगाने वाढत आहे.

पारंपारिकपणे आतापर्यंत हाउसवेअर प्रोडक्ट्सच्या खरेदीबाबत तिची उपयुक्तता, कार्य प्रदर्शन यांचाच अधिक विचार करण्यात येतो. चांगल्या कार्य प्रदर्शनाबरोबरच, कमी मेहनतीची गरज असणारी आणि वापरण्यास सुलभ असणारी प्रोडक्ट्स ग्राहकांच्याकडून अधिक पसंत केली जातात. आज बाजारपेठेतील सर्व श्रेणींमध्ये अशा प्रकारची प्रोडक्ट्स ग्राहकांच्याकडून पसंत करण्यात येतात. परंतु गेल्या २५ वर्षांत भारतीय हाउसवेअर उद्योगाला वस्त्र आणि खाद्यपदार्थ उद्योगातील तेजी अनुभवता आली नाही. याचे कारण म्हणजे या श्रेणीतील बहुतेक प्रोडक्ट्स हे चांगले डिझाईन आणि ब्रँडींगचा अभाव असणारे होते. रिटेलर्सना कायमच याबाबत चांगले ब्रँड्स आणि उत्कृष्ट डिझाईन केलेल्या प्रोडक्ट्सची प्रतिक्षा राहत होती. चांगली डिझाईन, उच्च तंत्रज्ञान, ब्रँडिंग आणि सुंदर सादरीकरण ही हाउसवेअर विभागाचीही वैशिष्ट्ये बनल्यानंतर मात्र रिटेलर्सना या विभागातही अनेक संधी दिसू लागल्या. त्यामुळे प्रोडक्ट्सच्या किंमती तसेच नफ्याचे प्रमाणही वाढू लागले. रिटेल स्पेस वाढल्यामुळे या विभागात नवनवीन व्यावसायिकांचा प्रवेश होऊ लागला आणि हाउसवेअर व्यवसायात लक्षणीय वाढ दिसून येऊ लागली.

अजूनही भारत हा व्यवसाय सुरु करणे आणि सांभाळण्यासाठी एक जटील देश असल्यामुळे बाजारपेठेला ग्राहकाला समजून घेण्याची प्रक्रिया अतिशय बिकट असते. किंमतीबरोबरच संबंधित वस्तूचे महत्वही पटवून द्यावे लागते. तरीही भारतीय हाउसवेअर बाजारपेठेची क्षमता आणि वृध्दी आंतरराष्ट्रीय ब्रँड्सना मोठ्या प्रमाणावर आकर्षित करत आहे.

# नवीन हॉल २ मध्ये होम डेकोर

भारतात होम डेकोर प्रोडक्टस आणि ॲक्सेसरिजची बाजारपेठ प्रत्येक वर्षी २० टक्क्यांनी वाढत आहे. ग्राहकांकडून होम डेकोर प्रोडक्ट्सची मागणी दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे अधिकाधिक रिटेलर्सना आपल्या स्टोअर्समध्ये या श्रेणींसाठी अधिक जागा ठेवावी लागत आहे. हाच ट्रेंड फॉलो करताना एचजीएच इंडिया २०१८ मध्ये नवीन हॉल २ हा फक्त होम डेकोर श्रेणीमधील प्रोडक्टस आणि ॲक्सेसरिजसाठी राखीव ठेवला आहे.

वॉलपेपर्स, डेकोरेटिव सिंथेटिक आणि वूडन फ्लोरिंग, वॉल डेकोर, टेबल टॉप्स, मूरल्स, आर्टिफॅक्ट्स, पेंटिंग्ज, डेकोरेटिव क्लॉक्स, फोटो फ्रेम्स, फिगरिन्स, फ्लॉवर्स, फ्रेगरन्स, डेकोरेटिव कॅंडल्स, कॅंडल स्टॅंड्स, डेकोरेटिव मिरर्स आणि लाईट्स; हॅंडिक्राफ्ट्स आणि डेकोरेटिव फर्निचर आणि ॲक्सेसरिज होम रिटेलर्स तसेच ग्राहकांना अधिकाधिक आकर्षित करत आहेत.

एचजीएच इंडिया त्यांच्या होम डेकोर एक्झिबिटर्सना त्यांचा ब्रॅंड या श्रेणीमध्ये राष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचवण्याची संधी उपलब्ध करुन देत असतो. या ठिकाणी त्यांचे प्रोडक्ट्स एखाद्या अनब्रॅंडेड कमोडीटिजप्रमाणे विकले जात असतात.
















पाहुण्यांना हॉल २ मध्ये त्यांच्या स्टोअरसाठी एक संपूर्ण नवीन श्रेणी अनुभवता येणार आहे. यामध्ये हॅंडिक्राफ्ट्स, आर्टिफॅक्ट्स आणि मॉडर्न मशीन मेड डेकोरेटिव ॲक्सेसरिजच्या व्यापक रेंजचा समावेश आहे. या ठिकाणी सुमारे २० ब्रॅंड्स आणि वितरक संपूर्ण जगभरातून आयात केलेली वॉलपेपर्सची विस्तृत श्रेणी प्रदर्शित करणार आहेत. हे एक्सलुसिव वॉलपेपर पॅव्हेलियन ऑल इंडिया वॉलपेपर कव्हरिंग असोसिएशनने म्हणजेच (एआयडब्ल्यूए) उभारले आहे. या पॅव्हेलियनमध्ये हॅंडिक्राफ्ट्सची विस्तृत श्रेणी प्रदर्शित केली जाणार आहे, जिचे आयोजन एक्सपोर्ट प्रमोशन कौंसील फॉर हॅंडिक्राफ्ट्स (ईपीसीएच) आणि हॅंडिक्राफ्ट्स मेगा क्लस्टर मिशन (एचएमसीएम) यांच्यावतीने करण्यात येणार आहे. येथे मुरादाबाद, फिरोजाबाद, जोधपूर, जयपूर, आग्रा, उत्तर-पूर्व राज्ये, जम्मू आणि काश्मिर, गुजरात आदी ठिकाणांवरुन येणाऱ्या डेकोरेटिव ग्लास, कर्टन रॉड्स, मिरर्स, फ्रेगरन्स, फ्लोअर कवरिंग्ज आणि होम डेकोर ॲक्सेसरिज रिटेलर्सकडून प्रदर्शित केल्या जाणार आहेत.

या श्रेणीत अनेक एक्झिबिटर्स डेकोर, फंक्शनल उपयुक्त प्रोडक्ट्स आणि गिफ्टसचे पर्याय सादर करणार आहेत.

# वॉलपेपर्स दिसणार नवीन रंग आणि ढंगात

भारतीय बाजारपेठेत वॉलपेपर्स निर्मात्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आल्याचे लक्षात आल्यामुळे गेल्या वर्षी एचजीएच इंडियामध्ये ऑल इंडिया वॉलपेपर कवरिंग असोसिएशन (एआयडब्ल्यूए) या नावाने वॉल कवरिंग नॅशनल असोसिएशनची स्थापना करण्यात आली. ही संस्था प्रथमच हॉल २ मध्ये खास वॉलपेपर्स पॅव्हेलियन आयोजित करणार आहे. या ठिकाणी सुमारे २० प्रदर्शक जगभरातील बेसिक, प्रिमियम आणि लक्झरी वॉलपेपर्सची विस्तृत श्रेणी सादर करणार आहेत.

वॉलपेपरबाबत भारत ही जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी बाजारपेठ आहे जिथे प्रत्येक वर्षी मागणीमध्ये १०० टक्क्यांची वाढ होत आहे. तरीही देशात बेस वॉलपेपर्सची मागणी पुरवण्याची क्षमता असणारा एकही घरगुती उत्पादक नाही. प्रिमियम तसेच बेसिक श्रेणीमध्येही आयातीवरच अवलंबून रहावे लागत आहे.

आज जगभरातील वॉलपेपर्स आणि ब्रॅंडस प्रामुख्याने चायना, कोरिया, तुर्की, यूएसए, यूके, इटली, जर्मनी, फ्रान्स, बेल्जियम, नेदरलॅंड्स आदी देशांमधीलच आहेत. आज मात्र भारताकडे याबाबत उदयाला येत असणारी मोठी बाजारपेठ म्हणूनच पाहिले जात आहे. त्यामुळे वॉलपेपर ब्रॅंड्स भारतामध्ये त्यांचे वितरण आणि रिटेल नेटवर्क विस्तारण्यास इच्छुक आहेत. भारतातील प्रस्थापित वॉलपेपर व्यावसायिक नाविन्यपूर्ण मटेरियल्स आणि डिझाईन्सचा समावेश करण्यासाठी त्यांच्या प्रोडक्ट्सची श्रेणी विस्तारत आहेत. स्पर्धा तीव्र होत असल्यामुळे त्यात टिकून राहण्यासाठी ते जगभरातून आयात करत आहेत. एचजीएच इंडिया रिटेलर्सना वॉलपेपर ट्रेंडमध्ये अग्रेसर राहण्यासाठी मदत करत आहेत.

वॉलपेपर्स पॅव्हेलियनमध्ये आपली प्रोडक्ट्स प्रदर्शित करणाऱ्या काही एआयडब्ल्यूए मेंबर्समध्ये मार्शल्स, ग्रॅटेक्स, एक्सेल वॉल इंटेरियर्स, एच अँड एच वॉल कव्हरिंग, ॲडोर्निस, एसटीसी वॉलपेपर, ॲटको इंटिरियर्स, आर्टिसन फर्निशिंग, डागा वॉलपेपर्स, क्रिएटिव वॉलपेपर, डब्ल्यू.एस. इंडिया, रॉयल वॉलपेपर्स, इनडिझाईन, के२इम्पेक्स, एससी शेठ अँड सन्स, स्वीट होम, डिझाईन रॅप आणि यूडीसी यांचा समावेश आहे.










**वॉलपेपरची भारत ही जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी बाजारपेठ आहे. जिथे प्रत्येक वर्षी मागणीमध्ये १०० टक्क्यांची वाढ होत आहे.**

याशिवाय वॉल किंग, निलया, अल्केमी डिकोर, मुन्शी डिजिटल वॉलपेपर, वॉल इफेक्ट्स, स्पिन डेकोर यांच्यासारखे भारतीय वॉलपेपर ब्रॅंड्सही हॉल २ मध्ये आपली प्रोडक्ट्स प्रदर्शित करतील. फ्रान्सचा कॅसामांस, यूके चा कोल अँड सन, बेल्जियमचा ओमेक्सको, जर्मनीचा झिमर आणि -होडी, यूकेचा डिझायनर्स गिल्ड आणि हार्लीक्वीन तसेच फ्रान्सच्या एलिटीस यांच्यासारखे नामांकीत ब्रॅंडस हॉल १ मध्ये भारतीय पार्टनर एफ अँड एफसोबत आढळून येतील. एफ अँड एफही त्यांचे स्वतःचे ब्रॅंड्स प्रदर्शित करणार आहेत.

युरोपियन आणि अमेरिकन वॉलपेपर्सचा आघाडीचा वितरक दुबई स्थित एनजीसी नफीस पहिल्यांदाच हॉल २ मध्ये १४ नामांकित आंतरराष्ट्रीय ब्रॅंड्सचे प्रोडक्ट्स प्रदर्शित करणार आहे. या ब्रॅंड्समध्ये प्रामुख्याने जर्मनीचा राश, यूकेचा द पेपर पार्टनरशिप आणि डेकोर लाईन, यूएसएचा कॉलीन्स आणि कंपनी आणि नेदरलॅंडच्या बीएन इंटरनॅशनल या ब्रॅंड्सचा समावेश आहे.

एचजीएच इंडिया २०१८ भारतीय वॉलपेपर बाजारपेठेला अधिक विस्तृत बनवण्यासाठी रिटेलर्सना वॉलपेपरची मोठी व्हरायटी पाहण्याची संधी उपलब्ध करुन देणार आहे.